# मेट्रो-३ पास की नापास लवकरच ठरणार

## सिग्नल, कोच, ट्रॅक ट्रॅक्शनच्या चाचण्या महिनाभर चालणार

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १२ : मुंबईतील पहिली भूमिगत मेट्रो अशी ओळख असलेल्या कुलाबा-आरे या मेट्रो-३ मार्गाच्या पहिल्या टप्प्याचे आरे-वांद्रे-कुर्ला संकुलापर्यंत काम पूर्ण झाले आहे. त्यानुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून त्याच्या सिग्नल टेलिकम्युनिकेशन, कोच (रोलिंग स्टॉक), ट्रॅक ट्रॅक्शन अशा विविध प्रकारच्या चाचण्या सुरू आहेत. या चाचण्या यशस्वी झाल्यानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून अंतिम सुरक्षा तपासणी केली जाणार आहे. त्यामुळे मेट्रोच्या विविध प्रणाली चाचण्यांमध्ये पास होतात की नापास, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सुरक्षा आयुक्तांच्या मंजुरीनंतरच प्रवासी सेवा

मेट्रो ट्रेन प्रवासी सेवेत आणण्यासाठी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांची मंजुरी महत्त्वाची आहे. सध्या वेगवेगळ्या यंत्रणांच्या चाचण्या घेतल्या जात असून त्या पूर्ण झाल्यानंतर मेट्रो सुरक्षा आयुक्त तपासणी करून अंतिम मंजुरी देतील. त्यानंतरच ही मार्गिका प्रवासी वाहतुकीसाठी खुली होऊ शकणार असल्याची माहिती एमएमआरसीएलच्या एका अधिकाऱ्याने दिली. मुंबई मेट्रो-३ ही ३३ किलोमीटर लांबीची भूमिगत मार्गिका असून त्यावर २८ स्थानके असणार आहेत. पहिल्या टप्प्यात बीकेसी-आरे दरम्यान सेवा सुरू केली जाणार आहे.